# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - १४**

**(सभावृत्तांत)**

दिनांक–२१/०६/२०१७ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार,दिनांक २१/०६/२०१७ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.सावळे सिमा रविंद्र - सभापती
२) मा.उत्तम प्रकाश केंदळे
३) मा.मुंढे उषा अंकुश
४) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
५) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे
६) मा.कुटे निर्मला संजय
७) मा.कोमल दिपक मेवानी
८) मा.आशा धायगुडे-शेंडगे
९) मा.गोफणे अनुराधा देविदास
१०) मा.वैशाली जालिंदर काळभोर
११) मा.राजू मिसाळ
१२) मा.अमित राजेंद्र गावडे
१३) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

याशिवाय मा.श्रावण हर्डीकर-आयुक्त, मा.अच्युत हांगे-अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव,मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक,मा.चव्हाण-प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय–आरोग्य वैद्यकीय अधिकारी,मा.लांडे-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सहआयुक्त, मा.पाटील,मा.तुपे,मा.दुधेकर,मा.पठाण –सहशहर अभियंता,मा.डोईफोडे,मा.खोसे,मा.दंडवते,मा.दुरगुडे, मा.इंदलकर,मा.आष्टीकर,मा.लोणकर, मा.खोत,मा.बोदडे-सहाय्यक आयुक्त,मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक,मा.पाटील-प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र,मा.आवारी-प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ),मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी,मा.निकम,मा.इंगळे,मा.घुबे,मा.लडकत,मा.कुलकर्णी,मा.खाबडे,मा.बरशेट्टी,मा.जुंधारे,मा.गलबले,मा.घोडे, मा.ओंभासे,मा.गट्टूवार,मा.पुजारी,मा.गायकवाड,मा.भोसले,मा.मोरे,मा.पाटील,मा.रत्नपारखी-कार्यकारी अभियंता,मा.डॉ.गोरे-पशुवैद्यकीय अधिकारी,मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी,मा.लावंड-कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

(कु.ओवी विनय सातपुते या इ.८वी. मध्ये शिकणा-या विद्यार्थीनीने स्कूबा डायव्हींगमध्ये पिंपरी चिंचवड शहरातील सर्वात लहान स्कूबा डायव्हर होण्याचा मान पटकविला आहे, त्याबद्दल या विद्यार्थीनीचा मा.सभापती सौ.सिमा सावळे यांचे हस्ते सन्मानचिन्ह आणि पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.)

----------

दिनांक ०७/०६/२०१७ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १२) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –</u>**

विषय क्रमांक ३१) मा.स्थायी समिती ठराव क्र.४४० मध्ये मजकूर समाविष्ट करणेबाबत – मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.अमित गावडे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.७१ मध्ये दुरुस्ती करणेबाबत – मा.राजू मिसाळ, मा.अमित गावडे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३३) राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमाकरीता येणा-या खर्चाबाबत...

-----------

ठराव क्रमांक – ५२४ विषय क्रमांक – १

दिनांक – २१/०६/२०१७ विभाग – स्थापत्य

सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भः- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/इमु/कावि/२१०/१६ दि.९/६/२०१६

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२२/१६/२०१६-१७ अन्वये प्रभाग क्र.३५ भोसरी येथील मनपा सार्वजनिक स्वच्छतागृहांची स्थापत्यविषयक कामे करणेकामी मे.बालाजी कन्स्ट्रक्शन नि.र.रु.५,६०,२०१/- (अक्षरी र.रु.पाच लाख साठ हजार दोनशे एक फक्त) पेक्षा १०.००% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.५,२९,३९०/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधी मध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –५२५ विषय क्रमांक – २

दिनांक – २१/०६/२०१७ विभाग – ड क्षेत्रिय कार्यालय, जलनिःसारण

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.डक्षेका/जनि/कावि/४२/२०१७ दि.९/६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

प्रस्तावात नमूद केलेनुसार ठेकेदार मे. सुरज कॉन्ट्रक्टर यांस पिंपरी चिंचवड मनपाचे ड प्रभागातील नलिकांची वार्षिक ठेकेदारी पद्धतीने साफसफाई करणे व चोकअप काढणे या कामासाठी दिनांक ०५/०७/२०१७ पासून ०४/०७/२०१८ पर्यंत द्वितीय वर्षासाठी मुदतवाढ मिळणेस व या कालावधीसाठी रक्कम रूपये १,०६,१४,६००/- (अक्षरी र.रू. एक कोटी सहा लाख चौदा हजार सहाशे फक्त) पेक्षा ५% कमी या स्विकृत निविदा दराने र.रू.१,००,८३,८७०/- च्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –५२६ विषय क्रमांक – ३

दिनांक – २१/०६/२०१७ विभाग–क क्षेत्रिय कार्यालय, जलनिःसारण

सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.कक्षेका/जनि/कावि/९६३/२०१७ दि.८/६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

प्रस्तावात नमुद केले नुसार ठेकेदार मे.आर्यन पंप्स अँण्ड एन्व्हायरो सोल्युशन प्रा.लि.यांस पिंपरी चिंचवड मनपाचे क प्रभागातील जलनिःसारण नलिकांची वार्षिक ठेकेदारी पद्धतीने साफसफाई करणे व चोकअप काढणेकामी ०२/०७/२०१७ पासून ०१/०७/२०१८ पर्यंत द्वितीय वर्षासाठी मुदतवाढ मिळणेस व या कालावधीसाठी रक्कम रूपये १,०५,५१,२७६/- (अक्षरी र.रू.एक कोटी पाच लाख एक्कावन्न हजार दोनशे शहात्तर फक्त) पेक्षा १.५०% कमी या स्विकृत निविदा दराने र.रू.१,०३,९३,००७/- च्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –५२७ विषय क्रमांक – ४

दिनांक – २१/०६/२०१७ विभाग – मध्यवर्ती साहित्य भांडार

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मसाभां/२/कावि/३५७/२०१७ दि.९/६/२०१७

विषय – राष्ट्रीय कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेकामी आवश्यक असणारी वाहने भाडेतत्वावर घेणेबाबत...

विषय क्रमांक ४चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५२८ विषय क्रमांक – ५

दिनांक – २१/०६/२०१७ विभाग – माहिती व तंत्रज्ञान

सूचक – मा.वैशाली काळभोर अनुमोदक – मा.राजू मिसाळ

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मातंवि/१२/कावि/१३६/२०१७ दि.९/६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी योजना अंमलात आणणे करिता विशेष उद्देश वहन (SPV) (पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेड) चे बोध चिन्ह तयार करणेबाबत सहभागी स्पर्धकांपैकी विजेत्यांना पारितोषिक देणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सदर अभियानाचे अंतर्गत केंद्र शासनाचे स्मार्ट सिटी संकेतस्थळावर पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेडचे बोध चिन्ह स्पर्धेच्या माध्यमातून तयार करून मागविणेत आलेले होते त्यातून निवड केलेल्या बोध चिन्हांची माहिती MyGov या केंद्रशासनाचे संकेतस्थळास पाठवून विजेत्यांची नावे मागवून घेवून त्यांना १ले, २ रे, ३रे बक्षिस अनुक्रमे र.रु २५,०००/-, २०,०००/- व १५,०००/- याप्रमाणे एकूण र.रू.६०,०००/- (अक्षरी र.रू.साठ हजार फक्त) संबंधित विजेत्यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५२९ विषय क्रमांक – ६

दिनांक – २१/०६/२०१७ विभाग – उद्यान

सूचक – मा.अमित गावडे अनुमोदक – मा.कैलास बारणे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/४/कावि/१६७/२०१७ दि.९/६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

तळवडे/चिखली गायरान, वाघेश्वर मंदिर परिसर च-होली व मिलटरी डेअरी फार्म पिंपरी याठिकाणी नव्याने १०,००० वृक्षारोपण करून वृक्षारोपणाची देखभाल व सरंक्षण 3 वर्षे कालावधीसाठी प्रति रोप ६१०/- याप्रमाणे करणेचे काम महाराष्ट्र राज्य वनविकास महामंडळ (महाराष्ट्र शासन उपक्रम) यांचेकडुन विना निविदा थेट पध्दतीने करून घेणे व त्याकामी येणारी र.रू.६१,००,०००/- (अक्षरी र.रू.एकसष्ट लाख फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

**निर्णय** – किती आणि कुठे-कुठे झाडे लावली आहेत, हे स्थायी समितीच्या निदर्शनास आणून द्यावे.

वृक्षारोपण करताना रोपण केलेल्या झाडांना नंबरींग करावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५३० विषय क्रमांक – ७

दिनांक – २१/०६/२०१७ विभाग – उदयान

सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/६/कावि/५३३/२०१७ दि.९/६/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपा उदयान विभागाकडील कोटेशन नोटीस क्र.२/२०१७-१८ मनपाचे छत्रपती शिवाजी महाराज उद्यान सांगवी उद्यानातील स्पिंकलर सिस्टिम दुरूस्त करणेकामी मे.ईश्वरी एंटरप्रायजेस यांचे कोटेशन नोटीस अंदाजपत्रकिय दर.रू.१,८७,१०१/- (अक्षरी र.रू.एक लाख सत्याऐंशी हजार एकशे एक

फक्त) अंदाजपत्रकिय दरापेक्षा ०१% ने कमी (र.रु.१,८५,२३०/-) या दराचे कोटेशन स्वीकृत करणेत आले असून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५३१ विषय क्रमांक – ८
दिनांक – २१/०६/२०१७ विभाग – उदयान
सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/६/कावि/५३१/२०१७ दि.९/६/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपा उदयान विभागाकडील कोटेशन नोटीस क्र.१/२०१७-१८ पुणे मुंबई हमरस्ता निगडी ते दापोडी रस्त्याचे कडेचे वृक्षारोपणासाठी व रस्ता मध्य दुभाजकासाठी टॅंकरने पाणीपुरवठा करणेचे कामकाज मे.संदीप ट्रान्सपोर्ट यांचे कोटेशन नोटीस अंदाजपत्रकिय दर र.रू.१,९९,५००/- (अक्षरी र.रू.एक लाख नव्यान्नव हजार पाचशे फक्त) अंदाजपत्रकिय दरापेक्षा ०१% ने कमी (र.रु.१,९७,५०५/-) या दराचे कोटेशन स्वीकृत करणेत आले असून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५३२ विषय क्रमांक – ९
दिनांक – २१/०६/२०१७ विभाग – उदयान
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/६/कावि/५२९/२०१७ दि.८/६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.०३/३५/२०१६-१७ अन्वये बहिणाबाई चौधरी (सर्पोद्यान व पक्षालय) देखभाल व संरक्षण करणेकामी मे. बी. व्ही. जी इंडीया ली. मी. या ठेकेदाराची निविदा अंदाजपत्रकिय दरापेक्षा निविदा रक्कम रुपये २५,८८,१६०/- (अक्षरी र.रू.पंचवीस लाख अठ्ठ्याऐंशी हजार एकशे साठ फक्त) पेक्षा २.२०% कमी दराने स्विकृत करणेत आले असून प्रस्तुतकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५३३ विषय क्रमांक – १०
दिनांक – २१/०६/२०१७ विभाग – स्थापत्य अ मुख्यालय
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे

संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/अ-मुख्य/४९४/१७ दि.१२/७/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४२/२०/२०१६-१७ प्रभाग क्र.२६ मध्ये डांबरी रस्त्यांची दुरुस्ती देखभालीची कामे करणेकामी M/s.H.C.Kataria नि.र.रु. ११,१९,३१३/- (अक्षरी र.रू.अकरा लाख एकोणीस हजार तिनशे तेरा फक्त) पेक्षा १३.०६% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१०,२१,७८७/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट

कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –५३४ विषय क्रमांक – ११

दिनांक – २१/०६/२०१७ विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी

सूचक – मा.वैशाली काळभोर अनुमोदक – मा.राजू मिसाळ

संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पअक/१०/कावि/३१०/२०१७ दि.१२/६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

घनकचरा व्यवस्थापनांतर्गत मोशी कचरा डेपो येथे सद्यस्थितीत सुमारे ६५० ते ७०० टन कचरा जमा होत असून दिवसें दिवस त्याचे प्रमाण वाढत आहे. सद्यस्थिती मध्ये गोळा होणा-या कच-यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करणेसाठी (१) मेकॅनिकल कंपोस्टिंग प्लॅन्ट, (२) सॅनिटरी लॅन्डफिल टप्पा-१,(३) प्लॅस्टिक कच-यापासून इंधन निर्मिती, (४) गांडूळखत प्रकल्प कार्यान्वित आहेत. सद्यस्थितीत मेकॅनिकल कंपोस्टींग प्लॅन्ट व सॅनिटरी लॅन्डफिल साईटचे चालन, देखभाल व दुरुस्तीचे काम मे.बी.व्ही.जी.इं.प्रा.लि. या कंपनीमार्फत सुरु असून सदर दोनही कामांची मुदत दिनांक १७/०४/२०१७ रोजी संपत असलेने मेकॅनिकल कंपोस्टींग प्लॅन्ट व सॅनिटरी लॅन्डफिल साईटचे चालन, देखभाल व दुरुस्तीचे कामाची एकत्रित निविदा तयार करणेत येऊन नि.नो.क्र.ENV/12/2016-17 दिनांक २४/०३/२०१७ अन्वये निविदा प्रसिध्द करणेत आलेली आहे. परंतू सदर कामाची निविदा दिनांक १४/०४/२०१७ रोजी उघडली असता एकच निविदा प्राप्त झाली असल्याने निविदेस मुदतवाढ देणेत आलेली आहे, त्यामुळे सदर नविन कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन ठेकेदारास कामाचा कार्यारंभ आदेश मिळेपर्यंत विषयांकित मुळ कामास मुदतवाढ देणे आवश्यक असलेने दिनांक १५/०४/२०१७ रोजीच्या प्रस्तावानुसार मा.आयुक्त सो यांनी मान्यता दिलेली आहे. तथापी या कालावधीसाठी येणा-या खर्चास मा.स्थायी समिती मान्यता घेणे आवश्यक असल्याने सदर कामाच्या नविन निविदेची कार्यवाही पुर्ण होवून कामाचे आदेश देईपर्यंत मुळ चालू कामास निविदा मंजूर दराने (मेकॅनिकल कंपोस्टिंग प्लॅन्टसाठी र.रू.३५८.४० प्रति टन व सॅनिटरी लॅन्डफिल चालन देखभाल र.रू.१३९ प्रति टन) या दराने काम करून घेणेस व त्यासाठी येणा-या महसुली खर्चास मान्यता देणेत येत आहे.

**निर्णय**– दि.३१/०७/२०१७ पर्यंत मुदतवाढ देऊन विषय मंजूर करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –५३५ विषय क्रमांक – १२

दिनांक – २१/०६/२०१७ विभाग – मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.अमित गावडे अनुमोदक – मा.कैलास बारणे

संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/५/कावि/७७६/२०१७ दि.१२/६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे औदयोगिक प्रशिक्षण संस्था, मोरवाडी विभागाकडील ITI IMS System प्रणालीची प्रभावीपणे अंमलबजावणी होणेकरीता आवश्यक संगणकयंत्रणा (हार्डवेअर) खरेदी करणेकामी ऑनलाईन निविदा क्र.८५/२०१६-१७ अन्वये लघुत्तम निविदाकार मे.झूम कॉम्पुटर्स, पुणे यांचेकडून

तीन प्रकारचे आवश्यक संगणक साहित्य(संगणक संच,सर्व्हर व प्रोजेक्टर) खरेदीकामी र.रु.२९,१४,५६०/-व मे.एम.के.एंटरप्रायजेस यांचेकडून एक प्रकारचे प्रिंटर साहित्य खरेदीकामी र.रु.१,३५,०००/-असे एकत्रीत एकूण र.रु.३०,४९,५६०/-(अक्षरी र.रु.तीस लाख एकोणपन्नास हजार पाचशे साठ फक्त) दर स्विकृत करुन करारनामा करणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५३६ विषय क्रमांक – १३
दिनांक – २१/०६/२०१७ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.उत्तम कॆंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/०८/कावि/३५८/२०१७ दि.१२/६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विविध विभागासाठी व मा. पदाधिकारी यांना आवश्यक निमंत्रण पत्रिका, व्हिजीटींग कार्डस, लेटरहेड, शिफारसपत्र व पाकीटे छपाई साहित्य खरेदीकामी ई नि. सु.क्र.34/2016-17 अन्वये लघुत्तम निविदाकार १) मे.गणराज प्रिंटर्स आकुर्डी यांचे बाब क्रं 1,2,3,4,6,7,व 12 साठी एकुण र.रु.12,17,500/- २) मे.आशिष एंटरप्रायजेस चिंचवड यांचे बाब क्रं 05 करिता एकुण र.रु.1,80,000/- ३) मे.जय जयगणेश ऑफसेट पुणे बाब क्रं 8,9,10 व 11 करिता एकुण र.रु.1,71,450/- असे एकुण र.रु.15,68,950/- (अक्षरी र.रू. पंधरा लाख अडुसष्ट हजार नऊशे पन्नास फक्त) चे खर्चास व त्यांचेबरोबर करारनामा करुन खरेदीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५३७ विषय क्रमांक – १४
दिनांक – २१/०६/२०१७ विभाग – ब क्षेत्रिय विद्युत
सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे
संदर्भ:- मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.बक्षे/वि/२०३/२०१७ दि.१२/६/२०१७

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

म.न.पाच्या ब क्षेत्रीय कार्यालय विद्युत विभाग कार्यक्षेत्राअंतर्गत स्ट्रिट लाईट फिडर/इमारती करीता वीजपुरवठाकामी वीजमीटर बसविणेकरीता म.रा.वि.वि.कं.लि यांस अदा केलेल्या रक्कम रुपये ४८,६७०/- (अक्षरी रक्कम रुपये अठ्ठेचाळीस हजार सहाशे सत्तर फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५३८ विषय क्रमांक – १५
दिनांक – २१/०६/२०१७ विभाग – उद्यान
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/६/कावि/५४६/२०१७ दि.१२/६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.०३/३४/२०१६-१७ अन्वये चिखली मैलाशुद्धीकरण केंद्र उद्यान देखभाल संरक्षण करणेकामी मे. स्वामी विवेकानंद महिला स्वंय रोजगार

सेवा सहकारी संस्था मर्या या ठेकेदाराची निविदा अंदाजपत्रकिय दरापेक्षा निविदा रक्कम रुपये ३२,२७,८०८/- (अक्षरी र.रू.बत्तीस लाख सत्तावीस हजार आठशे आठ फक्त) पेक्षा १०.००% कमी दराने स्विकृत करणेत आली असुन प्रस्तुतकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५३९ विषय क्रमांक – १६

दिनांक – २१/०६/२०१७ विभाग – फ क्षेत्रीय कार्यालय

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.फक्षेका/४/कावि/१०६४/२०१७ दि.९/६/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, पुणे, मुख्य कचेरी, ४ ब, बी. जे. रोड, पुणे ४११००१ यांनी मनपाने विहीत केलेल्या लायसेन्स फी नुसार ११ महिन्यांची लायसेन्स फी र.रु.३,१२,७४१/- प्रचलित सेवाकर र.रु.४६,९०४/- व अनामत (४ महिन्यांची लायसेन्स फी) र.रु.१,१३,७२४/- मधुन यापुर्वीचे करार कालावधीसाठी जमा केलेली अनामत र.रु.१,०१,०८८/- वजा जाता उर्वरीत फरक र.रु.१२,६३६/- (अक्षरी र.रू.बारा हजार सहाशे छत्तीस फक्त) मनपा कोषागारात जमा केलेले असलेमुळे पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, चिखली शाखेचे वापरासाठी मौजे चिखली येथील महानगरपालिका शाळा इमारतीमधील गाळा क्र.३,४,५ व ६ (तळमजला) दि.१/०२/२०१७ ते दि.३१/१२/२०१७ या कालावधीकरीता लीव्ह अँण्ड लायसेन्सने देणेकामी व करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

**निर्णय**–**१**. प्रभागांच्या अखत्यारीतील महापालिकेच्या ज्या मिळकती ११ महिने कराराने भाड्याने दिल्या जातात,त्यांची करारनाम्याची मुदत संपल्यानंतर मुदतवाढ न देता टेंडरीग करावे. मुदतवाढीचे विषय स्थायी समितीपुढे आणू नयेत. स्थायी समितीकडून मुदतवाढ दिली जाणार नाही.

**२**. हा बँकेचा विषय असल्यामुळे विषयाला मंजूरी देण्यात येत आहे. या विषयाचे टेंडरीग दोन महिन्यांच्या कालावधीत झाले पाहिजे.

**३**. महापालिकेचे उत्पन्न वाढले पाहिजे. प्रभाग अधिका-यांनी त्यांच्या अखत्यारीतील मिळकतींची माहिती द्यावी. भूमि आणि जिंदगी विभाग आणि अतिरिक्त आयुक्त साहेबांनी या विषयात लक्ष घालावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५४० विषय क्रमांक – १७

दिनांक – २१/०६/२०१७ विभाग – कायदा

सूचक – मा.वैशाली काळभोर अनुमोदक – मा.राजू मिसाळ

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.कास/६/कावि/३४०/२०१७ दि.९/६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठीचे आकुर्डी येथील ना. न्यायालयामधील मा. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग व नियुक्त कर्मचारी यांचे सन-२०१६-२०१७ चे वेतन व भत्ते रक्कम रुपये ७४,८९,१२८/- (अक्षरी रक्कम रुपये चौ-याहत्तर लाख एकोणनव्वद हजार एकशे

अठ्ठावीस फक्त) पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडून प्रतिपुर्तीव्दारे अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५४१ विषय क्रमांक – १८

दिनांक – २१/०६/२०१७ विभाग – बी.आर.टी.एस.

सूचक – मा.अमित गावडे अनुमोदक – मा.कैलास बारणे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.बीआरटीएस/२३९/२०१७ दि.१४/६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने भारत सरकारचे शहरी निर्माण विभागाकडील जागतिक बँकेच्या सहकार्याने राष्ट्रीय बीआरटीएस गोलमेज परिषद (National Roundtable BRTS Conference) सिट्रस हॉटेल, पिंपरी येथे दि.२६/०५/२०१७ व २७/०५/२०१७ अशी आयोजित केली होती. सदर परिषदेसाठी केंद्रशासनाचे शहरी निर्माण विभागाचे उपसचिव मा.श्री व्ही.एस.पांडे जागतिक बँकेच्या वरीष्ठ वाहतुक तंत्रज्ञ श्रीमती नुपुर गुप्ता व त्यांचे सहकारी तसेच भारतातील गुजरात महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रदेश, तामिळनाडू, छत्तीसगढ या राज्यामधील अहमदाबाद, सुरत, राजकोट, इंदोर, पुणे, नया रायपूर, हुबळी-धारवाड, कोईंबतूर, चेन्नई अशा शहरातील सुमारे ३२ वरीष्ठ अधिकारी व स्थानिक अधिका-यांसह सुमारे ९०-९५ अधिकारी उपस्थित होते. सदर परिषदेचा पुर्वनियोजित खर्च र.रु.७,८६,३९६/- यास मा.स्थायी समिती ठराव क्र. दि.२४/०५/२०१७ नुसार मान्यता मिळालेली आहे. तथापि माईंड स्पेस हॉटेल्स आणि रिसोर्टस प्रा.लि. यांचे सिट्रस हॉटेल, पिंपरी चे दि.३१/०५/२०१७ रोजीचे प्रत्यक्ष खर्चाचे बिल इकडील विभागाकडे सादर केले आहे. सदर बिलानुसार या परिषदेसाठी र.रु.८,७५,६३५.५० इतका खर्च आलेला आहे. सदरचा खर्च मनपामार्फत देणे आवश्यक असल्याने वाढीव र.रु. ८,७५,६३५.५०-७,८६,३९६=८९,२३९.४९ (अक्षरी र.रू. एकोणनव्वद हजार दोनशे एकोणचाळीस एकोणपन्नास पैसे फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच सदरचा खर्च GEF फंडातून खर्ची टाकणे शक्य होणार आहे. तरी वाढीव खर्च र.रु.८९,२३९.४९ GEF फंडातून खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५४२ विषय क्रमांक – १९

दिनांक – २१/०६/२०१७ विभाग – माध्यमिक शिक्षण

सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.कैलास बारणे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माध्य/शि/४/कावि/३३३/२०१७ दि.१४/६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

मनपाच्या १८ माध्यमिक विद्यालयातील एकूण ८३०२ विद्यार्थ्यांना प्रत्येकी २ प्रमाणे शालेय गणवेश शिक्षण मंडळाकडील निविदा मंजूर दराने निविदाधारक मे.महालक्ष्मी ड्रेसेस अॅन्ड टेलरिंग फर्म, वाकड पुणे यांचेकडून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजित र.रु.२,२१,०६,१७४/- (अक्षरी र.रू.दोन कोटी एकवीस लाख सहा हजार एकशे चौ-याहत्तर फक्त) च्या खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास तसेच संबंधितांबरोबर करारनामा करणेस व पुरवठा आदेश निर्गत करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ.५ वी. ते इ.१० वी. चे वर्गातील ८३०२ विद्यार्थ्यांना तातडीने प्रति विद्यार्थी २ पिटी गणवेश पुरविणे आवश्यक असल्याने श्री.महालक्ष्मी ड्रेसेस

अँड टेलरिंग फर्म यांच्याकडून सदरचे लघुत्तम निविदा दराने पी.टी. गणवेश (लाल रंगाची फुल पॅन्ट व पांढ-या रंगाचा हाफ शर्ट व त्यास मॅचिंग लाल रंगाचे कॉलर पट्टी व मुलींना लाल रंगाची सलवार व पांढ-या रंगाचा कुर्ता, त्यास लाल रंगाची कॉलर पट्टी व लाल रंगाची ओढणी ठरलेल्या रंगानुसार) खरेदी करण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास आणि करारनामा करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच इ.५ वी. ते इ.१० वी.च्या विद्यार्थ्यांसाठी सन २०१६-१७ व २०१७-१८ सालासाठी निविदा शिक्षण मंडळाकडून मागविण्यात आल्या असून त्यानुसार प्राप्त झालेल्या निविदांपैकी लघुत्तम निविदाधारक श्री.वैष्णवी महिला कॉर्पोरेशन पुणे यांच्याकडून प्राप्त लघुत्तम निविदा दरानुसार ८३०२ विद्यार्थ्यांसाठी प्रति १ स्वेटर खरेदी करणेस व त्याकामी करारनामा करण्यास आणि येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच निविदा अटीशर्तीनुसार प्राप्त संबंधीत लघुत्तम निविदाधारकांकडून निविदा अटीशर्तीनुसार निविदा दर ग्राह्य कालावधीत प्राप्त लघुत्तम निविदा दरानुसार पुढील प्रत्येकी २ विद्यार्थी गणवेश, २ पी.टी. गणवेश व १ स्वेटर खरेदी करण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५४३ विषय क्रमांक – २०
दिनांक – २१/०६/२०१७ विभाग – करआकारणी व करसंकलन
सूचक – मा.उत्तम केंदळे. अनुमोदक – मा.कैलास बारणे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.कर/मुख्य/०३/कावि/३१५/२०१७ दि.१४/६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

सन 2017–2018 या आर्थिक वर्षात मा.महापालिका सभा ठराव क्र.973 दि. 06/01/2017 अन्वये मिळकतकरामध्ये (सामान्य करात) सवलत योजना मंजूर केलेल्या आहेत. सन 2016–2017 या आर्थिक वर्षात मिळकतकर भरणेबाबत व्यापक प्रसिद्धी होणेचे दृष्टीने शहरातील रेडीओ स्टेशन वरून माहिती प्रसिद्ध करणेत आली. या प्रसिद्धीमुळे मिळकतकर भरण्यामध्ये वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे. विविध भारती (101 FM) व रेड एफएम (93.5FM) या रेडीओ स्टेशनवरून दिनांक 16/06/2017 ते 30/06/2017 या कालावधीत थेट पद्धतीने करारनामा न करता मिळकतकर सवलत योजनेची माहिती प्रसिद्ध करणेकामी प्रस्तावात नमुद प्रमाणे येणा-या अंदाजे र.रु.2,39,875/- (अक्षरी र.रू. दोन लाख एकोणचाळीस हजार आठशे पंचाहत्तर फक्त) किंवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५४४ विषय क्रमांक – २१
दिनांक – २१/०६/२०१७ विभाग – ब क्षेत्रीय कार्यालय,आरोग्य
सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे
संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.बक्षेआ/५/कावि/४१२/२०१७ दि.९/६/२०१७

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

प्रभाग क्रमांक २०,२१,२२,२३,२४,४२,४९,५०,५१,५२,५३ मधील दैनंदिन शौचालय साफसफाई कामी यापूर्वी मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.आ/४/कावि/१८४/२००८ दि.६/५/२००८ नुसार क्षेत्रीय अधिका-यांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार स्थानिक बेरोजगारांच्या सहकारी संस्था,स्वयं सेवी

संघटना यांचे कडून साफसफाईचे काम करारनामा करुन घेणेत येतो. सदर आदेशानुसार असे करार जास्तीत जास्त ११ वर्षापर्यतच्या कालावधीसाठी करता येतात. त्यानुसार ब क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील अशा प्रकारचे काम करणा-या संस्था मे.समृद्धभारत स्वयं रोजगार सह सेवा संस्था मर्या. व मे.दीन महिला आधार रोजगार संस्था यांची करारनाम्याची मुदत दिनांक ३१/१२/१६ रोजी व मे.महर्षि वाल्मिकी स्वयं रोजगार सेवा संस्थेची मुदत दि.३१/३/१७ रोजी संपुष्टात आलेली आहे. त्यामुळे मे.समृद्धभारत स्वयं रोजगार सह सेवा संस्था मर्या. व मे. दीन महिला आधार रोजगार संस्था या संस्थांना पुढील ७ महिन्यांसाठी व मे.महर्षि वाल्मिकी स्वयं रोजगार सेवा संस्थेस ४ महिने मुदतवाढ देणेस मा.आयुक्त दिनांक-२०/१२/१६ व दि.१८/३/१७ च्या प्रस्तावानुसार मान्यता दिलेली आहे. प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे प्रति सीट २५०/- या दराने अपेक्षित खर्च र.रू.९,१०,५००/- (अक्षरी र.रू.नऊ लाख दहा हजार पाचशे फक्त) पर्यंत काम करुन घेणेकामी करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५४५ | विषय क्रमांक – २२

दिनांक – २१/०६/२०१७ | विभाग – स्थापत्य

सूचक – मा.निर्मला कुटे | अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/४ड/कावि/९८/१७ दि.१४/६/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.६५/१६/२०१६-१७ अन्वये प्रभाग क्र.४६ येथील आरक्षण क्र. ६४० मध्ये बांधणेत येत असलेल्या शाळा इमारती मध्ये फायर फायटिंग सुविधा पुरविणेकामी मे.एच.सी.कटारीया नि.र.रू.९,७३,७४८/- (अक्षरी र.रू.नऊ लाख त्र्याहत्तर हजार सातशे अठ्ठेचाळीस फक्त) पेक्षा **४%** कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने र.रू.९,३४,७९८/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील. या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –५४६ | विषय क्रमांक – २३

दिनांक – २१/०६/२०१७ | विभाग – पाणीपुरवठा

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे | अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/२९७/२०१७ दि.१५/६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.१२/११/२०१६-१७ अन्वये अशुध्द जल उपसा केंद्र, रावेत येथे टप्पा क्र. 1 आणि 2 योजनेमधील 50 एम.एल.डी पंपाकरिता पर्यायी पंपसेट बदलणे व आनुषंगिक कामे करणेकामी मे.एक्सेल इलेक्ट्रिकल्स निविदा रक्कम रू.१,३६,७८,९५२/- (अक्षरी र.रू. एक कोटी छत्तीस लाख अठ्ठ्याहत्तर हजार नऊशे बावन्न फक्त) पेक्षा २१.६०% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.१,१२,६०,५१३/-पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट

कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –५४७ विषय क्रमांक – २४

दिनांक – २१/०६/२०१७ विभाग –नागरवस्ती विकास योजना

सूचक – मा.वैशाली काळभोर अनुमोदक – मा.राजू मिसाळ

संदर्भ:- मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.नावियो/३/कावि/२६४/२०१७ दि.१५/६/२०१७

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिलांसाठी विविध कल्याणकारी योजने अंतर्गत पहिल्या मुलीवर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणा-या अथवा पहिली मुलगी असताना दुसरी मुलगी झाल्यास दुस-या मुलीवर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणा-या महिलेस अर्थसहाय्य देणेकामी या महिला बालकल्याण योजने अंतर्गत सन 2014-15 या आर्थिक वर्षातील 1, सन 2015-16 या आर्थिक वर्षातील 14, सन 2016-17 या आर्थिक वर्षातील 59, व सन 2017-18 या आर्थिक वर्षातील 2, अशा एकूण 76 लाभार्थींना अर्थसहाय्य देणे व त्याकामी येणा-या र.रू.8,35,000/- (अक्षरी र.रू.आठ लाख पस्तीस हजार फक्त) इतके खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच सदरची योजना १२ महिने खुली असल्याने जसे अर्ज प्राप्त होतील तसे पात्र ठरणा-या व अपात्र ठरलेल्या लाभार्थींना कागदपत्रांची पुर्ततेनंतर पात्र ठरलेल्या लाभार्थींना अर्थसहाय्य देणेस व सदरचा खर्च सन 2017-18 या आर्थिक वर्षातील तरतूदीतून करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –५४८ विषय क्रमांक – २५

दिनांक – २१/०६/२०१७ विभाग –मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ:- मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.मभां/०४/कावि/३४९/२०१७ दि.१४/६/२०१७

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माहिती व जनसंपर्क विभागास आषाढी वारी पालखी सोहळा सन २०१७ देहु आळंदी येथील दिंडीधारकांकरीता तंबुत टाकणेसाठी उपयोगी पडणारी ताडपत्री साहित्य ई नि सु क्र.02/2017-18 अन्वये प्रसिध्द करुन ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. प्राप्त निविदेमधील मे सिध्दी कॉपीअर अँड स्टुडंट कन्झुमर स्टोअर, पिंपरी यांचे ताडपत्री प्रती नग र.रु.3412/- नुसार 650 नग ताडपत्री खरेदीकामी एकुण र.रु.22,17,800/- (अक्षरी र.रु.बावीस लाख सतरा हजार आठशे फक्त) इतका खर्च येणार आहे. प्राप्त लघुत्तम दर स्विकृत करणेस मान्यता दिलेली असुन लघुत्तम निविदाकार यांचेबरोबर विहीत नमुन्यात करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेत आले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

**निर्णय- १)** सबव्हाऊचर्स व्हॅट व्हेरीफीकेशनसाठी द्यावेत. यामागील विलंबाचे कारण सांगावे. स्थायी समितीने घेतलेली बैठक, महापौर साहेबांनी घेतलेली बैठक आणि त्यानंतर झालेला विलंब याची कारणे द्यावीत.

**२)** सविस्तर चौकशी अहवाल, लॅबचा अहवाल प्राप्त होत नाही तोपर्यंत ठेकेदाराला बील देण्यात येऊ नये. सदर अटींच्या अधीन राहून ठेकेदाराला बील दिले जाईल. विषय क्र.२५

सबजेक्ट टू म्हणजे ज्या ज्या अटी-शर्ती सांगितल्या आहेत, त्या लक्षात घेऊन मंजूर करण्यात येत आहे.

**३)** स्थायी समितीमध्ये जयंती/महोत्सव साजरे करणे इ. बाबतचे विषय ऐनवेळच्या विषयामध्ये मंजूरीकरिता आणू नयेत. प्रशासनाने/अधिका-यांनी कामकाजाचे कॅलेंडर तयार करावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –५४९ विषय क्रमांक – २६

दिनांक – २१/०६/२०१७ विभाग – अ क्षेत्रिय कार्यालय

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ:- मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.अक्षेका/निविदा/कावि/८८/२०१६ दि.७/६/२०१७

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिं.चिं.मनपाच्या अ क्षेत्रिय कार्यालयाकडील निविदा नोटीस क्र.2/6/2016-2017 अन्वये प्रभाग क्र.१६ आकुर्डी गावठाण मध्ये मुख्य रस्त्यांचे खडीकरण व बीबीएम पद्धतीने डांबरीकरण करणेकामी मे.परमानंद कृपलानी या ठेकेदाराकडुन निविदा र.रू.9,23,951/- (अक्षरी र.रू.नऊ लाख तेवीस हजार नऊशे एक्कावन्न फक्त) पेक्षा -12.06% कमी दराने स्विकारण्यात आली आहे. मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –५५० विषय क्रमांक – २७

दिनांक – २१/०६/२०१७ विभाग – अ क्षेत्रिय कार्यालय

सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.अक्षेका/निविदा/कावि/९०/२०१७ दि.७/६/२०१७

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिं.चिं.मनपाच्या अ क्षेत्रिय कार्यालयाकडील निविदा नोटीस क्र.2/16/2016-2017 अन्वये प्रभाग क्र.१५ दत्तवाडी विठ्ठलवाडी मध्ये रस्त्यांचे खडीकरण व बीबीएम पद्धतीने डांबरीकरण करणेकामी मे.परमानंद कृपलानी या ठेकेदाराकडुन निविदा र.रू.9,23,951/- (अक्षरी र.रू. नऊ लाख तेवीस हजार नऊशे एक्कावन्न फक्त) पेक्षा -12.06% कमी दराने स्विकारण्यात आली आहे. मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५५१ विषय क्रमांक – २८
दिनांक – २१/०६/२०१७ विभाग – अ क्षेत्रिय कार्यालय
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे
संदर्भ:- मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.अक्षेका/निविदा/कावि/९२/२०१७ दि.७/६/२०१७

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिं.चिं.मनपाच्या अ क्षेत्रिय कार्यालयाकडील निविदा नोटीस क्र.2/19/2016-2017 अन्वये प्रभाग क्र.१४ भक्ती शक्ती उद्यान मधील शाळा इमारतीची दुरुस्ती करणेकामी मे.विद्या एंटरप्रायजेस या ठेकेदाराकडुन निविदा र.रू.8,72,736/- (अक्षरी र.रू.आठ लाख बाहत्तर हजार सातशे छत्तीस फक्त) पेक्षा -17.10% कमी दराने स्विकारण्यात आली आहे. मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५५२ विषय क्रमांक – २९
दिनांक – २१/०६/२०१७ विभाग – स्थापत्य उद्यान
सूचक – मा.वैशाली काळभोर अनुमोदक – मा.राजू मिसाळ
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था.उ/कावि/३५/२०१७ दि.१६/६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

केंद्र शासनाच्या अमृत योजने अंतर्गत पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रात हरित क्षेत्र (GreenSpace) विकसित करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाच्या पत्र क्र.अमृत-२०१६/ प्र.क्र.३४०/नवि/-३दि.०५/०१/२०१७ रोजीच्या पत्रानुसार ग्रीन स्पेसेस विकसित करण्याकरिता वास्तुविशारद म्हणून मे.एनगार्क आर्किटेक्टस् यांची पिंचिं.मनपा साठी नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांना निविदा रक्कमेच्या १.५०% + सर्व्हिस टॅक्स अशी फी अनुज्ञेय आहे. सद्यस्थितीत वास्तुविशारद यांना सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या दोन्ही आर्थिक वर्षासाठी मनपा क्षेत्रात अमृत योजनेअंतर्गत उद्याने विकसित करण्याकरिता मे.एनगार्क आर्किटेक्टस् यांची वास्तुविशारद म्हणून नियुक्ती करणे आवश्यक असून त्यांना निविदा रक्कमेच्या १.५०% + सर्व्हिस टॅक्स अदा करणे व नियमानुसार करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

**निर्णय**- मे.एनगार्क आर्किटेक्टस् यांची वास्तुविशारद म्हणून शासनाकडून नियुक्ती केली आहे. प्रशासनाकडून संबंधितांना सूचित करण्यात यावे की, महापालिकेचे सन्मा.नगरसेवक /नगरसेविका, अधिकारी यांनी माहिती घेण्यासाठी संपर्क साधल्यास त्यांना माहिती देण्यात यावी. प्रत्यक्षात काय काम करणार आहेत याची माहिती आणि सदस्यांपुढे सादरीकरण करण्यात यावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५५३ विषय क्रमांक – ३०

दिनांक – २१/०६/२०१७

सूचक – मा.अमित गावडे अनुमोदक – मा.कैलास बारणे

संदर्भ:- मा.सोनाली गव्हाणे, मा.योगीता नागरगोजे यांचा प्रस्ताव -

मा.माहिला व बालकल्याण समिती ठराव क्र.४ दि.६/६/२०१७ नुसार नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत महिला, मुले/ मुलींसाठी विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविल्या जातात. त्यातील “महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम” ही एक योजना असुन गेल्या चार वर्षापासुन ती मनपा स्तरावर राबविण्यात येते. तसेच सदरची योजना ही गेल्या चार वर्षापासुन मे.अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत चांगल्या प्रकारे राबविलेली आहे. आवश्यकतेनुसार तात्काळ मनुष्यबळाची उभारणी करणेची क्षमता तसेच मोठ्या प्रमाणावरील कामकाज करणेसाठीची आवश्यक असलेली आर्थिक क्षमता व विशेष करुन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील वस्ती पातळीवरील प्रशिक्षण घेण्याचा मे.अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेला भरपुर अनुभव आहे. त्यानुसार तातडीने योजना सुरु होणेकामी, तसेच संस्था निवडीसाठी लागणारा प्रदिर्घ कालावधीचा विचार करता, प्रशिक्षणास इच्छुक असलेली कुठलीही महिला प्रशिक्षणापासुन वंचित राहु नये, प्रशिक्षण लवकरात लवकर सुरु व्हावे या उद्देशाने मे.अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे. यांचे मार्फत थेट पध्दतीने मनपा स्तरावर एकुण २० प्रशिक्षण विषयांचे प्रशिक्षण हे मागील वर्षीच्याच महिला लाभार्थ्यांसाठीचे पात्रता निकष (अटी व शर्ती), सोबतच्या प्रपत्र “अ” मधील नमुद तपशीलानुसार व दरानुसार (सर्व करांसहीत) दि.३१/०३/२०१८ अखेरपर्यंतच्या कालावधी पर्यंतचे प्रशिक्षणाचे काम हे औद्योगिक प्रशिक्षण केंद्र (पि.चिं.मनपा) यांचा अभिप्राय घेऊन त्यानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करुन मे.आखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे यांचेमार्फत देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच सदर संस्थेस विविध मान्यता दिलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमात/प्रत्येक प्रशिक्षण वर्गात मोफत ओला व सुका कचरा विलगीकरण प्रशिक्षण देणे व त्याबरोबरच स्वच्छता विषयक, आरोग्य विषयक, पर्यावरण विषयक सदरची बाब महत्वाची असल्याने सदरच्या प्रशिक्षणा बरोबरच माहिती पत्रकही प्रत्येक प्रशिक्षण वर्गातील महिलांना वितरीत करण्याचे सदर संस्थेस बंधनकारक करणेस तसेच सदरची योजना ही मनपा स्तरावर मनपाच्या, यापुर्वीच्या मान्यता (धोरण)/कार्यपध्दती नुसार अटी व शर्तीनुसार राबविण्यास मान्यता देणेस तसेच महिलांच्या ज्ञान कौशल्यात वाढ व्हावी या उद्देशाने सदर योजनेचे आयोजन करणेत येते तसेच आवश्यक ती सहभाग शुल्काची रक्कम भरुन महिला प्रशिक्षणास येत असते. त्यानुसार मागील वर्षी प्रमाणेच चालु वर्षी देखील यापुर्वीच्या विविध व्यवसाय प्रशिक्षण या योजने अंतर्गत “महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम” या योजने अंतर्गत ज्या महिला/मुलींनी प्रशिक्षण घेतलेले आहे त्यांना देखील चालु वर्षी त्यांच्या मागणी नुसार एका पेक्षा अधिक विषयांचे प्रशिक्षण देणेस तसेच महिला/मुलींच्या इच्छे नुसार एखादे/तेच प्रशिक्षण देणे यांस मान्यता देणेस तसेच सदर योजनेमध्ये आवश्यकते नुसार बदल/दुरुस्ती करण्याचे/योजना अंमलबजावणी संबंधीत योग्य ती कार्यवाही करुन योजना राबविण्यासंबंधीचे सर्व अधिकार मा.आयुक्त सो.यांना देणेस व सदर योजनेअंतर्गत होणा-या प्रत्यक्ष प्रशिक्षण खर्चास मान्यता देणेस, सर्व कामगार कायद्याची अंमलबजावणी करण्याची व त्याप्रमाणे कागदपत्रे सादर करण्याचे संस्थेला बंधनकारक करणेस तसेच संस्थेचे काम हे महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रमांतर्गत होणा-या प्रशिक्षणाचे आयोजित करणे हे असुन संस्थेने विषयानुरुप

दिलेले दर हे फक्त त्याचसाठी जरी असले तरी महिलांच्या सबलीकरणासाठी सक्षमीकरणासाठी, त्यांच्या ज्ञान व कौशल्यात वाढ व्हावी, महिलांनी नोकरी/व्यवसाय करुन त्यांच्या कौटुंबिक आर्थिक उत्पन्नात वाढ व्हावी हा सदर योजनेचा मुख्य उद्देश आहे. त्यासाठी संस्थेमार्फत ज्ञान कौशल्य कार्यक्रमात सहभाग घेतलेल्या महिलांना रोजगार/स्वयंरोजगारास प्रवृत्त करणे, त्यासंबंधीत व्यवसाय उभारणी ते विक्री, विक्री पश्र्चात सेवा तसेच जमा खर्च नोंदी, आवश्यक परवानगी/दाखले इत्यादीबाबत त्यांना प्रशिक्षण वर्गात मोफत मार्गदर्शन करणे बंधनकारक करणेस तसेच विषयानुरुप अभ्यासक्रम पाहुनच व तो आपल्याला झेपेल याची खात्री वाटणा-या म्हणजेच तो कोर्स करण्याचे ज्ञान/कुवत/क्षमता असलेल्या गरजू महिलाच सहभाग शुल्क भरुन प्रशिक्षणात सहभागी होण्यासाठी फाईल सादर करीत असतात. त्यामुळे विशिष्ट अशा शैक्षणिक अर्हतेच्या अटीची आवश्यकता नाही. विशिष्ट शैक्षणिक अर्हतेअभावी महिलांना त्यांचे इच्छेनुरुप ज्ञान कौशल्य कार्यक्रमास सहभागी होणेपासुन वंचित ठेवले अथवा ते वंचित राहिले असे होणार नाही, केवळ शैक्षणिक अर्हतेतुन ज्ञानाची पातळी कळुन येत नाही. त्यामुळे कुठलीही गरजु/इच्छुक महिला ज्ञान कौशल्य कार्यक्रमापासुन वंचित राहु नये, कार्यक्रमात सहभागी करुन घेत नाही अशा कुठल्याही प्रकारच्या तक्रारीस वाव राहु नये, या हेतुने कुठलीही/विशिष्ट शैक्षणिक अर्हता न ठेवता सर्व इच्छुक साक्षर महिलांना ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रमात सहभागी होण्यास मान्यता देणेस तसेचसन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकामध्ये महिला व बालकल्याण योजनेसाठी आर्थिक तरतुद करणेत आलेली आहे. त्यात “महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम” या उपलेखाशिर्षासह एकुण ४२ उपलेखाशिर्षाचा समावेश आहे. तरी ‘महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम’ या उपलेखाशिर्षावर नागरवस्ती विकास योजना विभागाने उर्वरीत ४१ उपलेखाशिर्षांतर्गत केलेल्या तरतुदीमधुन सदर योजनेसाठी लाभार्थांच्या प्रतिसादानुसार प्रशिक्षणाचे वाढीव खर्चाकामी आवश्यकतेनुसार रक्कमा वर्ग करणेस मान्यता देणेस व त्यानुसार सदरची योजना ही मे.आखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे. यांचेमार्फत दि.३१/०३/२०१८ अखेर पर्यंतच्या कालावधीत राबविणेकामी व योजनेच्या अंमलबजावणीकामीच्या धोरणास व प्रत्यक्ष होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

**निर्णय- १)** प्रशिक्षण कोर्ससाठी आवश्यक तेथे शैक्षणिक अर्हता असावी. प्ले ग्रुप व नर्सरी टिचर्स प्रशिक्षण,सेल्सगर्ल व किरकोळ विक्रेता प्रशिक्षण, फ्रंट ऑफीस कम रिसेप्शनिस्ट प्रशिक्षण, रुग्ण सेविका व रुग्ण आहार संतुलन प्रशिक्षण, स्पोकन इंग्लिश आणि सुरक्षारक्षक या प्रशिक्षण कोर्सेसपैकी आवश्यक त्या प्रशिक्षणास आवश्यक ती शैक्षणिक अर्हता लावणेत यावी. लग्नापूर्वीच्या नावाचे शैक्षणिक प्रमाणपत्र असल्यास नावातील बदलाबाबत घोषणापत्र लाभार्थ्याकडून घेण्यात यावे.

**२)** अ,ब,क,ड,इ,फ असे प्रभागनिहाय सॅनिटरी नॅपकीनचे प्रशिक्षण कोर्स आयोजित करावेत.

**३)** कोर्स पूर्ण केलेल्या महिलेला रोजगार मिळावा म्हणून आणि त्या महिलेची मागणी असेलतर त्या महिलेस प्रशिक्षक म्हणून काम करायची संधी देण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**<u>यानंतर सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले -</u>**

ठराव क्रमांक –५५४ विषय क्रमांक – ३१
दिनांक – २१/०६/२०१७
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.अमित गावडे
संदर्भ:- मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.अमित गावडे यांचा प्रस्ताव –

मा.स्थायी समिती ठराव क्र.४४०, दि.३१/५/२०१७ मध्ये 'शिवसमर्थ मित्र मंडळ, विद्यानगर, रामनगर' हा मजकूर वगळून त्याऐवजी 'इलेव्हन फ्रेंडस स्पोर्टस क्लब' हा मजकूर समाविष्ट करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –५५५ विषय क्रमांक – ३२
दिनांक – २१/०६/२०१७
सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे
संदर्भ:- मा.राजू मिसाळ, मा.अमित गावडे यांचा प्रस्ताव –

मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.७१ दि.०५/०४/२०१७ अन्वये मे.जयगणेस ऑफसेट यांना मनपाचे सार्वत्रिक निवडणूक २०१७ करीता आवश्यक कागदपत्रांचे झेरॉक्स प्रती काढणेकामी मान्यता देण्यात आली आहे. सदर ठरावामध्ये ई.निविदा सु.क्र.१६/२०१६-१७ ऐवजी ई.निविदा सु.क्र.०८/२०१६-१७ अशी दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –५५६ विषय क्रमांक – ३३
दिनांक – २१/०६/२०१७ विभाग – माहिती व जनसंपर्क
सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माजसं/३/कावि/३४१/२०१७ दि.१७/०६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त दि.२५/०६/२०१७ ते दि.२६/०६/२०१७ रोजी २ दिवस छत्रपती शाहू महाराज पुतळा, केएसबी चौक, चिंचवड याठिकाणी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत आयोजित कार्यक्रमामधील कलाकारांचे मानधन, स्मृतिचिन्ह, फ्लेक्स, बॅनर छपाई, मान्यवर चहापान, भोजन व्यवस्था इ. करीता थेट पद्धतीने अंदाजे र.रु.५,५०,०००/- (अक्षरी र.रु.पाच लाख पन्नास हजार फक्त) अथवा येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सिमा रविंद्र सावळे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/५०/२०१७
दिनांक - २७/०६/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**(मा.महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्रमांक ०४ दिनांक ०६/०६/२०१७ अन्वये विषय क्र.३० चे लगत)**

| अ.क्र | विषयाचे नाव | कार्यक्रम कालावधी दररोज २ तास | | प्रति लाभार्थी एकुण प्रशिक्षण शुल्क र.रु. |
|---|---|---|---|---|
| | | दिवस | तास | |
| १ | २ | ३ | | ४ |
| १ | प्ले ग्रुप व नर्सरी टिचर्स प्रशिक्षण. | ४५ दिवस | ९० तास | २,४७५/- |
| २ | बायोडिग्रेडेबल पिशव्या तयार करणे. | ३० दिवस | ६० तास | १,९५०/- |
| ३ | वधु मेकअप प्रशिक्षण. | ७५ दिवस | १५० तास | ४,८७५/- |
| ४ | फ्रंट ऑफीस कम रिसेप्शनिस्ट प्रशिक्षण. | ३० दिवस | ६० तास | १,९५०/- |
| ५ | रुग्ण सेविका व रुग्ण आहार संतुलन प्रशिक्षण. | ४५ दिवस | ९० तास | २,९२५/- |
| ६ | सेल्सगर्ल व किरकोळ विक्रेता प्रशिक्षण. | ३० दिवस | ६० तास | १,६५०/- |
| ७ | सुरक्षारक्षक प्रशिक्षण. | २५ दिवस | ५० तास | १,६२५/- |
| ८ | सेंद्रिय खते व औषधी वनस्पतींची रोपे तयार करणे. | ४५ दिवस | ९० तास | २,९२५/- |
| ९ | स्पोकन इंग्लिश, संभाषणकौशल्य व व्यक्तिमत्व विकास प्रशिक्षण. | ९० दिवस | १८० तास | ४,९५०/- |
| १० | विमा सल्लागार प्रशिक्षण. | २५ दिवस | ५० तास | १,३७५/- |
| ११ | बालसंगोपन व आहार नियोजन प्रशिक्षण. | ४० दिवस | ८० तास | २,२००/- |
| १२ | हॉस्पिटॅलिटी सहाय्यक प्रशिक्षण. | ३० दिवस | ६० तास | १,९५०/- |
| १३ | कुशन कव्हर, डोअर मॅट, रजई तयार करणे. | ३० दिवस | ६० तास | १,६५०/- |
| १४ | प्लॉस्टिक ग्रॅन्युअल्स तयार करणे. | ३० दिवस | ६० तास | १,९५०/- |
| १५ | हस्तनिर्मितसह विविध प्रकारच्या पेपरपासुन विविध वस्तु/साहित्य तयार करणे. | ६० दिवस | १२० तास | ३,३००/- |
| १६ | भारतीय मिठाई, स्नॅक्स तयार करणे व लोणची, पापड, विविध मसाले, अ‍ॅडव्हान्स केक तयार करणे. | ७० दिवस | १४० तास | ४,५५०/- |
| १७ | रेक्झीनपासुन पर्स, बॅगा व विविध वस्तु तयार करणे. | २५ दिवस | ५० तास | १,६२५/- |
| १८ | सॅनिटरी नॅपकीन तयार करणे प्रशिक्षण. | १० दिवस | २० तास | ६५०/- |
| १९ | हाऊसकिपींग प्रशिक्षण. | ३० दिवस | ६० तास | १,९५०/- |
| २० | ज्वेलरी, फर टॉईज, केमिकल फ्लॉवर, सिरॅमिक फ्लॉवर पॉट, ग्लास पेटींग, स्टेन ग्लास पेंटींग, फ्रेमिंग, पोस्टर फ्रेमिंग तयार करणे प्रशिक्षण. | ७० दिवस | १४० तास | ४,५५०/- |